## महाराष्ट्र शासन- आरोग्य सेवा

## (जाहिरात)

औरंगाबाद विभागातील उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांच्या अधिपत्या खालील लातूर / उस्मानाबाद / बीड / नांदेड जिल्हयात असलेल्या आरोग्य विभागा अंतर्गत सर्व शासकिय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, येथील वैद्यकिय अधिकारी महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकिय अधिका-यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांचे नेमणूकीचे स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याचे कालावधीसाठी भरावयाची असून, विहीत शैक्षणीक अर्हताधारक उमेदवारांनी खालील अटीच्या अधिन राहून, दि.01/12/2018 रोजी सकाळी ११.०० वाजता मुळ कागदपत्रे व कागदपत्राच्या सांक्षाकित छायाप्रतिचा एक संच सोबत आणून प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावे.

### <u>अटी व शर्ती खालील प्रमाणे</u>

१) पदाचे नांव:- तदर्थ वैद्यकिय अधिकारी म.वै.आ.से गट-अ

२) शैक्षणीक अर्हता :-

अ) एम.बी.बी.एस अर्हता

ब) विशेषज्ञ पदांसाठी (बालरोग/ भिषक/ शल्य चिकित्सक/ बधिरिकरण /स्त्रीरोगतज्ञ इत्यादी तज्ञ पदासाटी त्या-त्या विषयातील पदव्युत्तर पदवी/ पदवीका)

३) वयोमर्यादा:- मुलाखतीचे दिनांकास वय ५८ वर्ष पेक्षा कमी असावे.

स्पष्टीकरण:- कंत्राटी तत्वावर काम करित असतांना कोणत्याही प्रकारे भविष्यात कायमस्वरुपी अथवा नियमित नेमणूक मिळणार नाही व उमेदवाराने तसे गृहीत धरु नये अथवा कंत्राटी नियुक्तीवरील उमेदवार तसा हक्क मागू शकणार नाही. नियमित सेवेतील उमेदवार उपलब्ध झाल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता तदर्थ वैद्यकिय अधिका-यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मुलाखती दिलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना लातूर मंडळातर्गत कोणत्याही शासकिय रुग्णालयात वा प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णालयाची निकड लक्षात घेवून वैद्यकिय अधिकारी गट-अ हया पदावर कंत्राटी तत्वावर ११ महिन्या करिता नेमणूक दिली जाईल. या करिता इच्छूक उमेदवारांनी मुलाखतीचे दिवशी अर्ज करुन मुळ शैक्षणीक व इतर आवश्यक दस्ताऐवजासह/ प्रमाणपत्रासह मुलाखतील प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक राहील.



Scanned by CamScanner

१) कंत्राटी, वैद्यकीय अधिकारी हे नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.

२) कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कत्राटी सेवा पुर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.

३) कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पुर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.

अ) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.

ब) कामामध्ये निष्काळजीपणा.

क) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.

ड) कामकाज अकार्यक्षम असणे/ सेवेची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळल्यास.

इ) गैरवर्तन /गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे.

ई) कार्यरत पदावर नियमित वैद्यकीय अधिकात्याची नियुक्ती झाल्यास.

४) सर्व सादर करणाऱ्या उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५) वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यांसाठी आंदोलन / संप / बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र १००/- रुपयांच्या स्टँप पेपरवर घेण्यात यावे.

६) या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

७) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी, वार्षिक वेतनवाढ अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

८) सदर तदर्थ नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

Scanned by CamScanner

शासन निर्णय क्रं.मवैअ-१०५४/ प्र.क्र.२४१/ सेवा-३ दि. ०२.०३.२०१५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे एम.बी.बी.एस. पात्रता धारकांना आदिवासी भागा करिता ४५०००/- इतके एकत्रीत मानधन व इतर भागा करिता ४००००/- इतके एकत्रीत दरमहा मानाधन दिले जाईल. तसेच विशेपज्ञांना आदिवासी भागा करिता ५५०००/- इतके एकत्रीत मानधन व इतर भागा करिता ५००००/- इतके एकत्रीत दरमहा मानाधन दिले जाईल.

| | |
|---|---|
| टिप १) | :- अर्जासोबत फोटो, शैक्षणीक अर्हता, ( तिन्ही वर्षाचे गुणपत्रीका) प्रयत्न प्रमाणपत्र, वयासंबधी दाखला, महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे/भारतीय वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, आंतरसावीयता प्रमाणपत्र, असल्यास अनुभव, तसेच मागास वर्गीय असल्यास तत्संबंधी जातीचा दाखला, जातपडताळणी वैद्यता प्रमाणपत्र साक्षांकित देणे आवश्यक राहील. |
| टिप २) | :- नियुक्तीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी अर्जासह टिप १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रतीचे संचासह व मुळ कागदपत्रासह सादर करावा व नियोजीत दिवशी मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. उमेदवारास मुलाखतीसाठी वेगळे मुलाखतपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| टिप ३) | :- उमेदवारांनी मुलाखतीचे दिवशी उपसंचालक आरोग्य सेवा लातूर येथे मुळ प्रमाणपत्रासह दि. 01/12/2018 रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहणे आवश्यक राहील. पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल. अपात्र ठरल्यास, मुलाखतीचे वेळीच त्यांना त्रूटी कळविल्या जातील, या बाबत पुन्हा वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. या बाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. |
| टिप ४) | मुलाखतीचे दिनांक/ वार यामध्ये बदल करणे, मुलाखत प्रक्रिया रद्द करणे या बाबत सर्व अधिकार मा.विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेतील समितीला राहतील.<br><br>**मुलखतीचे स्थळ** :- उपसंचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संकुल बार्शी रोड, लातूर<br><br>**मुलाखतीचा दिनांक**:- दि. 1/12/18 रोजी सकाळी ११.०० वाजता |

16/11/2018

निवड समिती अध्यक्ष
तथा विभागीय आयुक्त,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

सदस्य सचिव
तथा उपसंचालक,आरोग्य सेवा,
लातूर मंडळ, लातूर



Scanned by CamScanner